04/03/2021

Sakal



रत्नागिरी : मुकुल माधव फाउंडेशनतर्फे नानीज हायस्कूल येथे स्वच्छतागृहाच्या उद्घाटनप्रसंगी उद्योजक रवींद्र सामंत, 'फिनोलेक्स'चे अधिकारी, संस्था पदाधिकारी आदी.

# 'मुकुल माधव'तर्फे शाळांमध्ये स्वच्छतागृहांची उभारणी

## रत्नागिरी तालुक्यातील आठ शाळांत स्वच्छतागृहे

**सकाळ वृत्तसेवा**

रत्नागिरी, ता. ३ : मुकुल माधव फाउंडेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडने रत्नागिरी तालुक्यातील आतापर्यंत आठ शाळांमध्ये स्वच्छतागृहे बांधून दिली आहेत. आता नानीज हायस्कूल आणि धामणसे येथील शाळांमध्येही स्वच्छतागृहे दिली असून, त्याचे उद्घाटन काल (ता. २) करण्यात आले. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याच्या हेतूने ही स्वच्छतागृहे बांधण्याचा उपक्रम गेली दोन वर्षे सुरू आहे.

नाणीज पंचक्रोशी शिक्षण मंडळ व धामणसे येथील माध्यमिक विद्यालयासाठी स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात आली. याच्या उद्घाटनप्रसंगी उद्योजक रवींद्र तथा अण्णा सामंत, जि. प. सदस्य, पंचायत समिती सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक, संस्थेचे पदाधिकारी, इतर कर्मचारी, मुकुल माधव फाउंडेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अधिकारी उपस्थित होते.

मुकुल माधव फाउंडेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीज आरोग्य, शिक्षण, सामाजिक विकास, पर्यावरण व स्वच्छता या क्षेत्रात कार्यरत आहे. रत्नागिरी परिसरातील शाळांमध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याबरोबरच शाळांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्या गरजांची पूर्तता करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी होऊन स्वच्छतागृह बांधण्याचे काम हाती घेतले आहे. यापूर्वी पावस विद्यामंदिर, नेवरे हायस्कूल, कोतवडे हायस्कूल, गावखडीतील सरस्वती विद्यामंदिर, खेडशीतील महालक्ष्मी विद्यामंदिर, पालीतील मराठा मंदिर आणि जि. प. गोळप शाळा येथे आठ स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत. स्वच्छतागृहांबद्दल शाळेच्या मुख्याध्यापक व संस्थाचालकांनी मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांचे आभार मानले.